**महाराष्ट्र शासन**
**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) कोल्हापूर यांचे कार्यालय**
"वनवर्धन", ताराबाई पार्क, कोल्हापूर -४१६ ००३

महाराष्ट्र वन विभाग
Office - 0231/2653632,
E-mail ID –
ccftkolhapur@mahaoforest.gov.in
ccftkolhapur@gmail.com

स्पीडपोस्टद्वारे

क्रमांक कक्ष-६/नोसेल/सातारा/MSEDCL/२३-२४/21
कोल्हापूर -४१६००३ दिनांक -02 /04/२०२४.

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य, नागपूर.

**विषय :** Proposal for diversion of 0.3716 ha forest land for regularisation of lease of Forest land (Before 1980) for use of 33 KV X 11 KV Sub Station & other amenities from survey no 52 A, Gut. No. 77/1 at village Kshetra Mahabaleshwar, Tal.- Mahabaleshwar Dist. Satara, to the MSEDCL Satara, under section 2 (ii) of Forest (Conservation) Act 1980.

**संदर्भ :** १. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडीलपत्र FLD-२०२४/प्रक्र. १७/फ-१० दिनांक १६.०१.२०२४

२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर यांचेकडील पत्र कक्ष-१७/नोडल /कोल्हापूर/आयडी-१५६०८०/२९५३/२०२३-२४ दिनांक १६.०१.२०२४.

३. उपवनसंरक्षक सातारा यांचेकडील पत्र अ/कक्ष-६/जमीन/२०२३-२४/१५२३ दिनांक २७.०२.२०२४

४. या कार्यालयाचे पत्र कक्ष-६/नोसेल/सातारा/MSEDCL/२३-२४/६९३४ दिनांक ७.०३.२०२४

५. उपवनसंरक्षक सातारा यांचेकडील पत्र अ/कक्ष-६/जमीन/२०२३-२४/१६३३ दिनांक २२.०३.२०२४

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये सदर प्रस्तावामध्ये १ ते ६ त्रुटी उपस्थित करण्यात आलेल्या आहेत. संदर्भ क्र.३ अन्वये उपवनसंरक्षक सातारा यांनी १ ते ६ त्रुटींची पूर्तता करून अहवाल आवश्यक दस्तऐवजासह या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये त्रुटी असल्याने त्रुटी पूर्तता करणेसाठी संदर्भ क्र.४ अन्वये कळविण्यात आले होते. आता संदर्भ क्र.५ अन्वये त्रुटी पूर्तता अहवाल उपवनसंरक्षक सातारा यांनी या कार्यालयास सादर केला आहे. संदर्भ क्र.१ अन्वये उपस्थित केलेल्या १ ते ६ मुद्यांची माहिती खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | मुद्याची पूर्तता |
|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी, सातारा यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, सातारा यांना मौजे क्षेत्र महाबळेश्वर, जि. सातारा येथे स.नं. 51अ, ग.नं.77/1 येथील 0.3716 हे. जमीन उपलब्ध करुन दिलेल्या दिनांक 16/04/1974 च्या आदेशाची प्रत उपलब्ध करुन घ्यावी | प्रकरणी प्रकल्प यंत्रणेने त्यांचेकडील दिनांक 16/12/2022 रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, सातारा यांचेकडील दिनांक 16/04/1974 रोजीचे आदेशाची छायांकीत प्रत मागणी केली होती, परंतु सदर आदेशाची प्रत जिल्हाधिकारी, सातारा यांचे कार्यलयात आढळुण येत नसलेबाबत त्यांचेकडील दिनांक 20/12/2022 रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. (प्रपत्र -1) |

| | | |
|---|---|---|
| | | तथापि तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ चे पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे. |
| २. | जिल्हाधिकारी, यांनी उपकेंद्रासाठी उपलब्ध करुन दिलेली जमीन रेकॉर्डवर उपलब्ध कागदपत्रांवरुन लीजची मुदत 1999 मध्ये संपली असल्याचे नमुद केले आहे. तथापी लीज बाबतची कोणतीही कागदपत्रे दिसुन येत नाहीत. सदरची कागदपत्रे सादर करावीत. | याबाबत प्रकल्प यंत्रणेकडील संदर्भीय पत्रात नमुद केले प्रमाणे त्यांचे कार्यालयात तसेच उपवनसंरक्षक सातारा कार्यालयातील संबंधीत प्रकरणाच्या अभिलेखामध्ये तपासणी केली असता सदर लीज बाबतची कागदपत्रे मिळुन येत नाहीत.<br>तथापि तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ चे पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे. |
| ३. | उपकेंद्राचे बांधकाम सन 1980 पुर्वी केले असल्याचे कोणतेही कागदपत्र जसे की, बांधकामास प्रशासकीय मान्यता आदेश, बांधकाम पुर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र इ. उपलब्ध नाही. त्यामुळे उक्त बांधकाम दिनांक 25.10.1980 पुर्वी झाले किंवा कसे हे निश्चित कळत नाही. याबाबत कागदपत्रे सादर करावीत. | तत्कालीन विभागीय वन अधिकारी, सातारा यांनी जिल्हाधिकारी सातारा यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १०.०१.१९७३ चे पत्रामध्ये सदर वन जमीन दिनांक ३१.०७.१९९९ या कालावधी पर्यंत प्रकल्प यंत्रणेस भाडेतत्वावर देण्यात आलेचे नमूद आहे.<br>उपकेंद्राचे बांधकाम सन १९८० पुर्वी झाले आहे किंवा कसे याबाबत प्रकल्प यंत्रणेकडील कार्यालयात कोणतेही अभिलेख उपलब्ध नाहीत. |
| ४. | उपवनसंरक्षक, यांनी वनभंग अहवालामध्ये वनविभागासाठी आवश्यकता असेल तेव्हा प्राधान्याने 2 सुट आरक्षित ठेवावे, असे नमुद केले आहे. यावरुन प्रस्तावित क्षेत्रामध्ये विश्रामगृह आहे किंवा कसे, असल्यास ते स्थळ विवक्षित आहे का, याबाबतची माहिती सादर करावी. | प्रकरणी सदरच्या क्षेत्रामध्ये विश्रामगृह नसुन ते कर्मचारी वसाहत व पहाणी कक्ष आहेत. प्रकरणी यामधील दोन कक्ष वेळोवेळी उपलब्ध करुन देणेबाबत नमुद केले आहेत. या प्रस्तावित क्षेत्रात विश्रामगृह नाहीत. |
| ५. | प्रकल्प यंत्रणेने Judicial Court Wai, Satara येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे सदर प्रकरण कशासाठी दाखल करण्यात आले आहे. त्याबाबतची | प्रस्तावित ग.नं. 52 अ मधील वनक्षेत्रात Judicial Court Wai, Satara येथे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. प्रकरणी देवस्थान ट्रस्ट यांनी देवस्थान ट्रस्ट विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर असा दावा वाई येथील न्यायालयात |

| | | |
|---|---|---|
| | सद्यस्थितीदर्शक माहिती सादर करावी | विषयांकीत प्रस्तावित वनजमीन ग.नं. 52-अ ही देवस्थान ट्रस्टची असल्याबाबत दावा दाखल केला आहे. |
| ६. | पर्यायी वनीकरणाकरीता प्रस्तावित केलेल्या मौजे खोलवडी, ता. वाई जि. सातारा येथील कं.न.169, ग.नं. 483 या क्षेत्राचे अधिकार अभिलेख सादर करावा. | प्रकरणी मौजे खोलवडी, ता. वाई, जि. सातारा येथील कं.नं. 169, ग.नं. 483 हे क्षेत्र राखीव वन असुन याबाबत नमुना नोंद वहीची छायांकीत प्रत, दिनांक 22/11/1894 रोजीची अधिसुचनाची छायांकीत प्रत यासोबत जोडुन सादर केली आहे. 7/12 ची छायांकीत प्रत. (प्रपत्र -2) |

वरीलप्रमाणे अहवाल तीन प्रतीत यासोबत सविनय सादर करण्यात येत आहे. कृपया सदर प्रस्तावावर आपले स्तरावरून पुढील संस्करण होणेस विनंती आहे.

(आर.एम.रामानुजम)

**मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),**

**कोल्हापूर.**

**सहपत्र :** वरीलप्रमाणे.

महोदय, मंजुरी मान्यतेसाठी

**प्रतिलिपी :** उपवनसंरक्षक सातारा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

**प्रतिलिपी :** Additional Executive Engineer Civil, MSEDCL Ltd., Krishna Nagar, Satara यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.